# मनरेगा योजनेमार्फत महिलांचे होणाऱ्या सक्षमीकरणाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास

**संयोगिता दिलीप सोरटे** सशोधक विद्यार्थिनी समाजशास्त्र आधीविभाग Email:sanyogitasorate1993@gmail.com

---

**गोषवारा** :

"महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना" अंतर्गत काम करणाऱ्या महिलांचा सहभाग आणि मनरेगा मध्ये काम करणाऱ्या महिलांचा सक्षमीकरणावर भर देतो. महिला सक्षमीकरणासाठी भारताच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्याची (MGNREGA) क्षमता प्रचंड आहे. मनरेगा मध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचा सहभाग आणि काम करताना त्यांना सकारात्मक आणि नकारात्मक अनुभवा सांगितले आहे. महिला सक्षमीकरणावर मनरेगा योजनेचा प्रभाव दिसून येतो.या संशोधन पेपर मध्ये अभ्यासलेले आहे.

**प्रस्तावना**

**ग्रामीण रोजगार योजना**

ग्रामीण भागातील लोकांसाठी रोजगार मिळावी म्हणून या योजनेची पायाभरणी वसंतराव नाईक सरकार यांनी 26 जानेवारी 1969 मध्ये सुरू केली. 1972 च्या भीषण दुष्काळात ही योजनेची योजना अतिशय क्रांतिकारी ठरली. रोजगार हमी योजना ही ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची हमी देणारी योजना ही ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराची हमी देणारी असून या योजनेचे जनक महानायक वसंतराव नाईक आहेत. या योजनेची उपयुक्त पाहता पुढे रोजगार हमी अधिनियमांची अंमलबजावणी 1977 पासून महाराष्ट्रात सुरू झाली.

ग्रामीण भागातील अकुशल व्यक्तींकरता रोजगार हमी योजना व महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम 1977 कलम 12 (s) नुसार वैयक्तिक लाभाच्या योजना सदर योजनांना राज्य शासनाच्या निधीतून अर्थसहाय्य केले जात होते.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 किंवा यालाच मनरेगा व पूर्वीचे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा नरेगा म्हणून ओळखला जाणार हा एक भारतीय सामाजिक कल्याण कल्याणकारी कायदा आहे. ज्याच्या उद्देश काम करण्याचा अधिकार याची हमी आहे. हा कायदा 23 ऑगस्ट 2005 रोजी मंजूर करण्यात आला, आणि ग्रामीण विकास मंत्री प्रभू वंश प्रसाद सिंह यांनी संसदे संस्थेत विधेयक मांडल्यानंतर पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या यूपीए सरकारच्या अंतर्गत फेब्रुवारी 2006 मध्ये याची अंमलबजावणी करण्यात आली.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा 2005 नुसार महिलांना प्राधान्य दिले आहे. एक तृतीयांश लाभार्थी महिला असतील ज्यांनी नोंदणी केली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही एक स्त्री पुरुष समानता योजना आहे. ज्यामध्ये स्त्री आणि पुरुष यांना समान वेतन देऊन महिलांसाठी वेतनाच्या दराचे स्वतंत्र वेळापत्रक,ट्रेनसाठी सुविधा, कामाच्या बाजूला शेड प्रधान करून महिलांच्या सहभागास प्रोत्साहन देते. मुले व बाल संगोपन सेवा राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान बरोबर एकत्रितपणे महिला जोडीदार देखील सादर केले गेलेले आहेत. जे पुन्हा महिलांच्या सहभागास सुलभ करतात. ही योजना लाभार्थ्यांच्या निवासस्थानाजवळ बांधकामे देण्याचाही प्रयत्न करते.

मनरेगाच्या माध्यमातून महिलांना नोकरीच्या संधी आणि योग्य वेतन मिळते. मनरेगा सर्वांना समान रोजगार संधी आणि समान वेतन प्रदान करते. कायदेशीर चौकटीचे काम आणि ग्रामीण लोकांच्या विशेषता ग्रामीण महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सुशिक्षिकांनाद्वारे विकासापर्यंत पोहोचणे महत्त्वाच्या आहे. या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांना व कुशल रोजगार पुरवला जातो. यामध्ये 100 दिवसां पर्यंत रोजगारांची हमी केंद्र सरकारची आहे व त्यानंतरची रोजगारची हमी ही राज्य सरकार देते. योजनेचे संपूर्ण कामकाज हे संगणकीतून असून लाभार्थी यांच्या बँक खात्यात त्यांच्या मजुरीची रक्कम जमा होते. हे सर्व कामकाज पारदर्शक पद्धतीने केले जाते. या योजनेअंतर्गत सार्वजनिक तसेच वैयक्तिक कामे देखील घेता येतात. बेरोजगारांना रोजगार निर्माण करून देण्याबरोबरच शाश्वत मतांनी रिंगण करणे हे या योजनेची उद्दिष्ट आहे.

**मनरेगा कामाचे स्वरूप, प्राधान्य व तत्वे :**

1. जलसंधारण व जलसंवर्धन कामे.
2. दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरण आणि वृक्ष लागवडी)
3. जलसिंचन कालव्यांचे कामे (लघु व सूक्ष्म जलसिंचन कामे)
4. अनुसूचित जाती जमाती, दारिद्र्यरेषेखालील भूसुधारक खालील व इंदिरा आवास योजनेचे लाभार्थी, कर्जबाजारी लहान व अल्प शेतकरी यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करणारी कामे.
5. पारंपारिक पाणी साठवण्याच्या योजनेचे नूतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.

6. भूविकासाची कामे.
7. पूरनियंत्रण, पूर संरक्षणाची कामे, पाण्यातील क्षेत्रात चाऱ्याची कामे.

ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्याची कामे.

**महिला सबलीकरणाची संकल्पना:**

सक्षमीकरण ही बहुपर्यायी संकल्पना असून त्यात अनेक परिणाम आहेत, त्यामुळे एकच व्याख्या नाही सक्षमीकरण ची संकल्पना व्यवस्थित आहे आणि क्षेत्रद्वारे वेगळया पद्धतीने वापरली जाते.

**व्याख्या** :

" महिला आणि विकासाच्या संदर्भात सक्षमीकरणाच्या व्याख्येमध्ये महिलांसाठी त्यांच्या पसंतीचा विस्तार आणि महिलांच्या आवडीच्या क्षमता वाढविणे आवश्यक आहे".( रेखा मेहरा, 1997)

**उद्दिष्टे** :-

1. मनरेगा योजना मार्फत महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.
2. मनरेगा योजनेमार्फत काम करताना महिलांना येणाऱ्या समस्या व आव्हानांचा अभ्यास करणे.

**गृहीतक** : -

मनरेगा योजनेमार्फत महिलांचे आर्थिक सक्षमीकरण होत आहे.

**संशोधन पद्धती : -**

प्रस्तुत अभ्यास हा विविध प्रकाशित स्त्रोत आणि इंटरनेट व्यवसायिक यांच्याद्वारे माहिती गोळा केलेल्या दुय्यम माहिती द्वारे आधारित वर्णनात्मक अभ्यास आहे.

**मनरेगा योजनेमधील महिलांसाठीच्या तरतुदी : -**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा महिलांना एक तृतीयांश लाभार्थी असणे आवश्यक आहे. अशी तरतुद करण्यात आली आहे. ही एक लिंक – तटस्थ योजना आहे. जी पुरुषांच्या बरोबरीने समान वेतन प्रदान करते.महिलांसाठी वेतन दराचे स्वतंत्र वेळापत्रक पाळणाघरसाठी सुविधा, मुलांसाठी कामाच्या बाजूला शेड आणि बाल संगोपन सेवा प्रदान करून महिलांच्या सहभागाला प्रोत्साहन देते.

मनरेगा योजनेमध्ये महिलांचा सक्षमीकरणाची भूमिका.

मनरेगा योजनेत नाव नोंदणी केल्यानंतर महिलांच्या रोजगार उत्पन्न बचत अन्न सुरक्षा आणि इतर घटक सुविधा मिळतात. महिला सक्षमीकरण ही एक सतत प्रक्रिया आहे आणि त्यासाठी महिलांबद्दलच्या आपल्या दृष्टिकोन आणि धोरणांमध्ये व त्यांच्या विकासासाठी स्वीकारल्या जाणाऱ्या धोरणात्मक काही आमूलाग्रह बदल घडवून आणण्याची गरज आहे. समाजातील महिलांच्या गरजा आणि आवश्यकतांबद्दल तर्कसंगत आणि लिंग अनुकूल दृष्टिकोन आणि त्यांच्या उत्पन्नासाठी सर्वांगीण दृष्टिकोन या अशा सक्षमीकरणासाठी पूर्व आवश्यकता आहे. त्यामुळे महिला सक्षमीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे, जी महिलांना आवश्यक असलेल्या विविध घटकांवर नियंत्रण ठेवण्यास सक्षम करते. (P.G ,S.N.S२०२२) PP 2

महिलांमध्ये मनरेगा महत्त्वाची भूमिका बजावते.

ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी मनरेगा योजना मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. राहणीमान आर्थिक स्थिती/परिस्थिती समान निर्णय करून पुरुष आणि महिला कामगारांना समान वेतन अधिकार आहे मनरेगा अंतर्गत महिलांचा सहभाग या योजनेअंतर्गत महिला कामगारांच्या सहभागास प्रोत्साहन देणारी विविध घटक आहेत. जातकामाचे मर्यादित तास, स्थानिक पातळीवरील कामाची उपलब्धता, पुरुष आणि स्त्रियांचे स्थलांतर कमी करणे, मजुरीच्या दरात भरीव वाढ. मल वेगवेगळ्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की स्त्री स्त्रिया मनरेगाच्या कार्यस्थळावर काम करत असताना त्यांच्या मुलांबद्दल चिंतीत राहतात. अगदी काही स्त्रिया योग्य बाल संगोपन सुविधा उपलब्ध नसल्यामुळे मनरेगाच्या नोकरीच्या सुविधा स्वीकारत नाहीत.

**मनरेगा योजनेचे फायदे**

1. मनरेगा योजनेमुळे ग्रामीण महिलांच्या जीवनशैली आणि आर्थिक परिस्थिती सुधारली आहे.
2. मनरेगा योजनेमुळे महिलांना आत्म सन्मानाचा आधार मिळाला आहे.
3. मनरेगा योजनेमुळे महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्याला हातभार लागला आहे.

4. मनरेगा योजनेमुळे लैंगिक वेदनातील तफावत कमी करण्यात व उत्पन्न वितरणात समानतेला चालना देण्यात मदत झाली आहे.

**मनरेगा कामाच्या ठिकाणच्य सोई सुविधा:**

- कामाच्या ठिकाणी सुरक्षित पिण्याचे पाणी, लहान मुलांसाठी सावली आणि विश्रांतीचा कालावधी, प्राथमिक उपचार पेटी, किरकोळ दुखापतीवर अल्पकालीन उपचारासाठी पुरेशी साहित्यांची सुविधा.
- मधुराज पंधरा दिवसाच्या आत मजुरी प्राप्त होण्याचा अधिकार आहे आणि पंधरा दिवसाच्या आत मजुरी प्राप्त न झाल्यास हजेरी पत्रक बंद केल्याच्या 16 दिवसानंतर विलंब झाल्यास प्रति दिन वेतनाच्या 0.05% दराने विलंब आकार मिळण्याचा अधिकार मजुराला आहे.
- तक्रार निवारण प्रधिकारी: ज्यामुळे मजूर/ नागरिकांना तक्रार नोंदवता येते आणि त्याबाबतच्या प्रतिसादचा शोध घेता येतो. तक्रारदाराला तक्रार नोंदवण्यासाठी ऑनलाईन किंवा ऑफलाइन द्वारे तक्रार नोंदवण्यासाठी सुविधा केली आहे. त्यामध्ये लेखी तक्रार, टोल फ्री हेल्पलाइन क्रमांक आणि ऑनलाइन तक्रार नोंदणी पोर्टल आणि मोबाईल ॲप्लिकेशन समाविष्ट आहे.

**माहितीचे विश्लेषण**

मनरेगा योजनेमधील ग्रामीण भागातील महिलांचा अभ्यास केला आहे. यासाठी ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणावर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे.

**कामाचे स्वरूप**

बहुतेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की कामाचे स्वरूप देखील महिलां कामगारांसाठी उपयुक्त नाही. ग्रामीण सहभाग आणि स्थानिक जलस्रोतांच्या नूतनीकरणाशी संबंधित निवडलेल्या बहुतेक प्रकल्पांमध्ये भौतिक शक्तीचा वापर करणे. आवश्यक असलेल्या कामात पुरुष कामगारांचा महिला कामगारांपेक्षा प्राधान्य देण्यात आले आहे. हजारिका (2009);Dr.S.K.(2013)

**अभ्यासा निष्कर्ष :**

महिला सक्षमीकरण, समस्या, आव्हाने व मनरेगाच्या माध्यमातून होणारी परिणाम यावरील साहित्य पुनरावंच्या निरीक्षणावरून हा अभ्यास निष्कर्ष काढतो. या योजनेत महिलांना सक्रिय सहभागाद्वारे कायदा महिलांच्या सक्षमीकरणाकडे नेतो. मनरेगाची कल्पना महिला सक्षमीकरण कार्यक्रम म्हणून करण्यात आली नव्हती तरीही या योजनेने महिलांचे आर्थिक आणि सामाजिक सक्षमीकरण घडवून आणले आहे.

**अभ्यासाच्या शिफारशी**

1. महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले असले तरी, त्यांना सामाजिक नियम आणि प्रतिकूल वाहतुकीची पर्याय यांना सामोरे जावे लागते.
2. महिलांना, स्वच्छता आणि संरक्षण जागा मिळणे गरजेचे आहे.
3. महिलांना स्वच्छ पाणी आणि साबणाने हात धुण्याची सुविधा मिळणे गरजेचे आहे.
4. महिलांना पिरियड डिग्निटी गरजेचे आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

1. V. Rajalakshmi V. Aelvam (2017); Impact of MANREGA on women Empowerment and Their Issues and Challenges:A
2. Deepti Chopra (31 July2019);Taking care into Account: Leveraging India's MGNREGA for Women's Empowerment .
3. Yashoda C.Y (2021); Women's Empowerment in India and ITS Importance -A Study .
4. Biju Joseph; Women empowerment through MGNREGA programmes.
5. A.Ranjan (2020) MGNREGA and Women Empowerment .
6. Masroor Ahmad Bey, Ajiay kumarTomar, Indu Varshney (2014); MGNREGA: Empowering Rural Poor Through Wage Empowerment.
7. महात्मा गांधी नरेगा समीक्षा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण ग्यारंटी अधिनियम 2005 शोध नून का संकलन. (2012)
8. https://Haryanarural .gov.in